MHNS230004602018

**दाखल दिनांक** – ०८.०३.२०१८
**नोंदणी दिनांक** – ०८.०३.२०१८
**निकाल दिनांक** – १०.०६.२०२६
**कालावधी** – ०८व.०३म.०२दि.

**<u>प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, इगतपुरी, जि. नाशिक येथील न्यायालयात</u>**

**(पिठासन अधिकारीः– श्रीमती ए. सी. रोकडे )**

**नियमित फौजदारी खटला क्र. ६५/२०१८**
**निशाणी क्र. ४२**

महाराष्ट्र शासन,
तर्फे पोलीस निरीक्षक,
पोलीस ठाणे वाडीव–हे ,
ता. इगतपुरी, जि. नाशिक. **अभियोग पक्ष**

**विरुध्द**

१. **दिनकर संतु येलमामे**
**वय** – ३२ वर्षे, **व्यवसाय**– शेती,

२. **लालु बाळु येलमामे**
**वय** – ३० वर्षे, **व्यवसाय** – शेती,
**दोघे रा.** शिरसाठे, ता. इगतपुरी,जि. नाशिक **आरोपी**

---

| | | |
|---|---|---|
| गुन्हयाची तारीख | : | २६.०४.२०१७ |
| गुन्हा नोंदणीची तारीख | : | २७.०४.२०१७ |
| दोषारोप पत्र दाखल केल्याची तारीख | : | ०८.०३.२०१८ |
| दोषारोपाची तारीख | : | ०३.१०.२०१९ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | : | २५.११.२०१९ |
| न्यायनिर्णय प्रलंबित ठेवल्याची तारीख | : | १०.०६.२०२६ |
| न्यायनिर्णय घोषित केल्याची तारीख | : | १०.०६.२०२६ |

**आरोपींचा तपशील**

| **आरोपी क्र.** | **आरोपीचे नाव** | **अटक तारीख** | **जामीन तारीख** | **गुन्हयाची कलमे** | **निर्दोष मुक्त/ शिक्षेस पात्र** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | दिनकर संतु येलमामे | २७.०४. २०१७ | २७.०४. २०१७ | भा.दं.वि. कलम ३५४ सह ३४ | **निर्दोष मुक्त** |
| **२** | लालु बाळु येलमामे | ०८.०५.२ ०१७ | ०९.०५. २०१७ | वरीलप्रमाणे | **निर्दोष मुक्त** |

## सरकार तर्फे साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्रमांक | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| सा. क्र. १(नि. ४१) | यशोदा शांताराम सोपनर | फिर्यादी |

.......................................................................................................

**सरकारी अभियोक्ता** – श्री. ए.जी.मनियार

**आरोपींतर्फे वकील** – श्री. आर.जी.वाजे

.......................................................................................................

## न्या य नि र्ण य
## (घोषित दि. १० जून २०२६ )

आरोपींविरुध्द भा.दं.वि कलम ३५४ सह ३४ प्रमाणे खटला चालविण्यात आला.

**२. सरकारपक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे –**

दि. २६/०४/२०१७ रोजी २२.३० वा. सुमारास शिरसाठे गावात फिर्यादीचे घरासमोर ता. इगतपुरी, जि.नाशिक येथे आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीचे घरी जावुन फिर्यादी अंगणात उभी असतांना आरोपी क्र. २ नामे लालू येलमामे याने फिर्यादीचा डावा हात धरुन तिचा विनयभंग केला. याबाबत फिर्यादीने पोलीस स्टेशन वाडीव–हे येथे फिर्याद दिली.

३. सदर फिर्यादीवरुन गुन्हा र.क्र.१०४/२०१७ भा.दं.वि. कलम ३५४ सह ३४ प्रमाणे नोंदविण्यात आला. संबंधित तपासी अधिकाऱ्यांनी घटनास्थळ पंचनामा तयार करुन साक्षीदारांचे जबाब नोंदविले व आरोपींविरुध्द सदरचे दोषोरापपत्र दाखल केले.

४. माझे पुर्वाधिकारी यांनी आरोपींवर नि.क्र.२२ नुसार भा.दं.वि. कलम ३५४ सह ३४ प्रमाणे दोषारोप ठेवलेला असुन सदरचा दोषारोप आरोपींना त्यांच्या बोलीभाषेतुन वाचुन दाखविला असता त्यांनी गुन्हा अमान्य केला.

५. सरकारपक्षाचा पुरावा संपल्यानंतर आरोपींविरुध्द दोषारोपपुर्ण असा पुरावा मिळुन न आल्याने फौजदारी प्रक्रिया सं.क. ३१३(१)(ब) नुसार निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६. सरकारपक्षाची केस व उभयबाजुंचा युक्तीवाद विचारात घेतल्यानंतर खालील मुद्दे माझे विचाराधीन उपस्थित झाले आहेत. मी त्यांचा निष्कर्ष त्यांच्या समोर खालील दिलेल्या कारणमिमांसेवरुन नोंदविलेला आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | सरकारपक्ष हे सिध्द करतो काय की, दि.२६.०४.२०१७ रोजी २२.३० वाजेचे सुमारास शिरसाठे ता. इगतपुरी, जि. नाशिक येथे आरोपी क्र. २ याने संगनमताने फिर्यादीचा विनयभंग करुन भा.दं.वि. कलम ३५४ सह ३४ प्रमाणे अपराध केला ? | ...नकारार्थी... |
| २. | अंतिम आदेश ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**मुददे क्रमांक १ व २ चे निष्कर्षाबाबतः**

७. दि. २६.०४.२०१७ रोजी २२.३० वाजेचे सुमारास शिरसाठे, ता.इगतपुरी, जि.नाशिक येथे आरोपी क्र. २ याने संगनमताने फिर्यादीचा विनयभंग केला, अशी सरकारपक्षाची केस आहे. फिर्यादी सा.क्र.१ यशोदा शांताराम सोपनर हिने तिच्या सरतपासात घटना कधी झाली हे आठवत नसुन फिर्यादमधील मजकूर माहित नसल्याचे कथन केले आहे. सरकार पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासादरम्यान सदर साक्षीदाराने तिचे व आरोपी दरम्यान आपसांत तडजोड झाली असल्याचे मान्य केले आहे.

८. प्रस्तुत प्रकरणात साक्षीदाराने आरोपीबाबत गुन्हाच्या अनुषंगाने त्याच्या सरतपासात कथन केले नाही. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करता सरकारपक्ष हा आरोपींनी संगनमताने फिर्यादीचा विनयभंग केला ही बाब शाबीत करण्यास असमर्थ ठरला आहे. सबब, मी मुद्दा क्र. १ यास नकारार्थी निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्र. २ च्या अनुषंगाने खालील आदशे पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ दिनकर संतु येलमामे व २. लालु बाळु येलमामे यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) अन्वये भा.दं.वि.क. ३५४ सह ३४ च्या दोषारोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.
२. आरोपींचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन कायम करण्यात येतात.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित केला.)**

APARNA CHANDRAKANT ROKADE
Digitally signed by APARNA CHANDRAKANT ROKADE Date: 2026.06.10 16:49:17 +0530

**दिनांकः–** १०.०६.२०२६ (ए. सी. रोकडे )

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, इगतपुरी. जि. नाशिक**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

Name of Stenographer : S.R. Bhapkar
Court : J. M. F. C. & C.J.J.D.at Igatpuri.
Date : 10-06-2026
Order signed by the
Presiding Officer on : 10-06-2026
Order uploaded on : 10-06-2026